# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com


**अतितात्काळ/महत्वाचे**

जा.क्र. विकाऔ/शिक्षण/२०१०/ १७६३

दिनांक:- / /२०१० 20 FEB 2010

प्रति,

प्राचार्य

शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित

पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या एमबीए/एमसीए संस्था

पदवी अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्था

पदविका अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय :- अल्पसंख्याक शिष्यवृत्तीची अमंलबजावणी..

संदर्भ :- मा.संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई यांचे पत्र क्रं.०३/अ.सं./तंशिस/२००९/०३८ दि.१६/२/१०

मा.संचालक तंत्रशिक्षण संचालनालयाचे संदर्भिय पत्र या सोबत जोडण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागातर्फे मुस्लिम,शीख,जैन,ख्रिश्चन,बौध्द या समुदायाच्या विदयार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची योजना लागु करण्यात आलेली आहे.सदर शिष्यवृत्तीची योजना प्रभावीपणे अमंलबजावणी करण्यासाठी आपल्या संस्थेत एका प्राध्यापकाची नेमणूक करावी. सदर प्राध्यापकावर खालीलपणे जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

१. प्रत्येक वर्गामधील वरील अल्पसंख्याक समुदायाच्या पात्र विदयार्थ्यांची यादी तयार करणे.
२. पात्र विदयार्थ्यांना ऑन लाईन पध्दतीने अर्ज भरण्यास मार्गदर्शन व मदत करणे.
३. विदयार्थ्यांचे अर्ज कन्फर्म करण्यासाठी संबंधित विदयार्थी विभागाला मदत करणे व मदतीत अर्ज दिनांक २/३/२०१० पर्यंत कन्फर्म होतील याबाबत दक्षता घेणे.
४. या बाबत या कार्यालयाशी तसेच तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई यांचे कार्यालयाशी वेळोवेळी संपर्क साधून आवश्यकतेनुसार पत्रव्यवहार करुन प्रभावीपणे योजना राबविण्यासाठी अमंलबजावणी करणे.

या बाबतची अधिसुचना तंत्रशिक्षण संचालनालया वेबसाईटवर उपलब्ध असुन कोणत्याही प्रकारच्या मार्गदर्शनासाठी या कार्यालयाशी संपर्क साधावा व आवश्यक कार्यवाही कालमर्यादेत पुर्ण करावी.

सोबत : मा.संचालकांचे पत्र.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय औरंगाबाद.

प्रत :- १. मा.संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म रा मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. या संस्थेचे प्रोग्रॅमर यांना माहितीस्तव व सदरील पत्र तात्काळ-कालमर्यादीत - अल्पसंख्याक शिष्यवृत्ती या शिर्षकाखाली या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रकशित करावी.